दैनिक सोलापूर


असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ४६ वा | बुधवार, दि. ०४ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR






# संपादकीय

## कळतंय पण...

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक तीन महिन्यांवर आली असतानाच राज्यात सत्तेवर असलेल्या महायुतीतील घटक पक्षांमधील धुसफूस जास्त तीव्रतेने समोर येऊ लागली आहे. सत्ताधारी महायुतीमध्ये घटक पक्षांचे नेते आणि मंत्री विविध वादग्रस्त विधाने करून विनाकारण वातावरण प्रदूषित करत आहेत.

अशा प्रकारच्या वादग्रस्त विधानांमुळे महायुती संकटात येऊ शकते, हे कळत असूनही कोणत्यातरी अपरिहार्यतेतूनच अशा प्रकारची विधाने केली जात आहेत. अशा प्रकारच्या विधानांच्या माध्यमातून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच टार्गेट करण्याचा प्रयत्न होत आहे. राज्य मंत्रिमंडळाचे सदस्य असलेले मंत्री तानाजी सावंत यांनी गेल्या आठवड्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसल्यामुळे नंतर उलटीची भावना होते, अशा प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त केली होती.

मी कट्टर शिवसैनिक असल्यामुळे काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या सोबत जाण्याचा विचारही आम्ही कधी केला नव्हता. पण मंत्रिमंडळ बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांसोबत आम्हाला मांडीला मांडी लावून बसावे लागते आणि आम्हाला ते आवडत नाही, अशा आशयाचे विधान तानाजी सावंत यांनी केले होते. त्यानंतर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्यांनी आणि इतर नेत्यांनी तानाजी सावंत यांना प्रत्युत्तर दिले आहेच शिवाय आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीसुद्धा तानाजी सावंत यांना पाचारण करून समज दिली आहे.

अर्थात, अशा प्रकारची वादग्रस्त विधाने करण्याबाबत तानाजी सावंत नेहमीच प्रसिद्ध राहिले आहेत. एका शेतकरी मेळाव्यात बोलत असताना शेतर्कयाचासुद्धा त्यांनी अत्यंत वाईट शब्दांमध्ये अपमान केला असल्याचा व्हिडिओसुद्धा मध्यंतरी व्हायरल झाला होता. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील एक मंत्री अशा प्रकारची वादग्रस्त विधाने करत असताना दुसरीकडे भाजपाच्या प्रवक्त्यांच्या यादीत असलेले ज्येष्ठ नेते गणेश हाके यांनीसुद्धा राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर झालेली युती दुर्दैवी असून त्याचे वर्णन असंगाशी संग असेच करता येईल, अशी टीका केल्यामुळे नवीन वाद निर्माण झाला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसशी युती करून महायुतीचा कोणताही फायदा झाला नाही. उलट लोकसभेमध्ये काही उमेदवार पराभूत झाले, असा दावा गणेश हाके यांनी भाजपच्याच एका कार्यक्रमात बोलताना केला. गणेश हाके हे भाजपाचे प्रमुख प्रवक्ते आहेत आणि अनेक वृत्तवाहिन्यांवर ते नेहमीच पक्षाची बाजू मांडत असतात. साहजिकच प्रवक्ते पदावर असणारी व्यक्ती जेव्हा अशा प्रकारची टीका करते तेव्हा त्याचा अर्थही समजून घ्यावा लागतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी तानाजी सावंत आणि गणेश हाके या दोघांनाही त्या त्या विषयामध्ये चोख शब्दांत उत्तर दिले असले, तरी यानिमित्ताने महायुतीतील मतभेदच नव्हे तर मनभेदही समोर आलेले दिसतात.

अर्थात, हा विषय जेव्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांच्यासमोर आला तेव्हा त्यांनी त्याला महत्त्व दिले नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पातळीवर आमचे सर्व काही व्यवस्थित सुरू आहे त्यामुळे संबंधित पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते आमच्यावर काय टीका करतात याचा मी फारसा विचार करत नाही, अशी भूमिका जरी अजित पवार यांनी घेतली असली तरी आमच्यावर अशा प्रकारची टीका झाली, तर त्या टीकेला त्याच शब्दांत प्रत्युत्तर देण्यापासून मी आमच्या कार्यकर्त्यांना रोखू शकत नाही, असाही इशारा त्यांनी दिला आहे.

गेल्या आठवड्यात जेव्हा मुंबईमध्ये भाजपच्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली होती त्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्ष काँग्रेसबरोबर केलेली युती प्रारंभी अनेकांच्या पचनी पडली नव्हती, असे विधान केले होते. भाजप कार्यकर्त्यांच्या मनात या युतीमुळे संभ्रम निर्माण झाल्यामुळेच लोकसभा निवडणुकीच्या निकालावर परिणाम झाला, असेही विधान तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. आता भाजपा कार्यकर्त्यांनी ही युती स्वीकारली आहे, असे जरी देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले असले तरी या निमित्ताने पक्षाच्या विचाराची दिशा मात्र निश्चित स्पष्ट होताना दिसत आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि भाजप यांच्याकडे पुरेसे संख्याबळ असतानासुद्धा अजित पवार यांच्या गटाला महायुतीमध्ये सामील करून घेण्यामागे कोणता हेतू होता याचे उत्तर अद्याप शिवसेनेच्या आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनाही सापडले नसल्यानेच हा सर्व संभ्रम निर्माण झाला आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये चांगले यश मिळवायचे असेल, तर महायुतीमधील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनीसुद्धा काळजीपूर्वक काम करण्याची गरज आहे आणि त्यासाठीच मंत्रिपदावरील किंवा प्रवक्ते पदावरील नेत्यांनी सावधपणे आपली मते मांडण्याची गरज या निमित्ताने समोर येत आहे.

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर मंत्री दीपक केसरकर यांनीसुद्धा जे अनाकलनीय विधान केले होते त्यामुळेसुद्धा वाद निर्माण झाला होता.

मंत्री हा सरकारचा प्रतिनिधी असतो आणि प्रवक्ता हा त्या पक्षाचा प्रतिनिधी असतो. साहजिकच अनेक वेळा मंत्री आणि प्रवक्ते यांनी घेतलेली भूमिका ही सरकारची किंवा पक्षाची मानली जाऊ शकते हे लक्षात घेऊनच आगामी कालावधीमध्ये महायुतीच्या घटक पक्षातील नेत्यांना आणि प्रवक्त्यांना बोलताना काळजी घ्यावी लागणार आहे. विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी महायुती गरजेची आहे हे कळत असूनही जर वळत नसेल, तर विधानसभा निवडणुकीमध्ये चांगल्या कामगिरीची अपेक्षा करता येणार नाही.

## पावसाळी वातावरणामुळे व्हायरल फिवरचे रुग्ण वाढू लागले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या चार दिवसांपासून सुरू झालेल्या पावसाळी वातावरणामुळे व्हायरल फिवरचे रुग्ण वाढू लागले आहेत. थंडी-ताप,सांधेदुधी, अस्थमाने त्रस्त रुग्ण शासकीय रुग्णालयासह नजीकच्या दवाखान्यात उपचार घेत आहेत. तसेच लहान मुलं सर्दी, खोकल्याच्या आजारानं त्रस्त असल्याचं चित्र शहरातील विविध रुग्णालयांतील डॉक्टरांशी साधलेल्या संवादानंतर समोर आले आहे. त्यातच गेल्या आठवड्यापासून डेंग्यू चिकुनगुनियाचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत असल्याचे सांगण्यात येत आहे. वयाची साठी ओलांडलेली वृद्ध मंडळी थंडी-तापाशिवाय सांधेदुखीनं त्रस्त



असल्याने नजीकच्या दवाखान्यात रांगा लावून उपचार घेत शासकीय रुग्णालयातील असल्याचे पाहायला मिळाले. बाह्यरुग्ण विभागात आलेल्या रुग्णांमध्ये थंडी-ताप, सांधेदुखीच्या विकाराचे रुग्ण अधिक असल्याचे +सांगण्यात येत आहे. दमा ( अस्थमा ) असलेल्या रुग्णांनी घराबाहेर पडू नये. वेळीच डॉक्टरांच्या सल्ला घ्यावा, अशाही सूचना देण्यात आल्या.

---

प्रबोधन

## त्यांची गा आरती । मनोभावे

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या प्रारंभकर्त्या लोकमान्य टिळकांना आपल्या या उपक्रमातून नेमकं काय साध्य करायचं होतं? फक्त लोकसंगटन की बुद्धिवादाची प्रतिष्ठापना ? की आणखी काही? शंभर- सव्वाशे वर्षांनंतर आजचं गणेशोत्सवाचं स्वरूप पाहिल्यानंतर टिळकांना हवं असलेलं लोकसंगटन काही अंशी साधलं, पण बुद्धिवादाच्या प्रस्थापनेचा त्यांचा हेतू सफल झालेला दिसत नाही. बुद्धिदाता गणेशाच्या उत्सवात बुद्धीचा दुष्काळ पडावा, हे संकट नाही का? एक विचारवंत खंत व्यक्त करताना म्हणतात, 'लोकमान्यांनी लोक- जागरणासाठी उत्सव सुरू केला. पण लोक जागे झाले का? लोकमान्य हे स्वतः मंदिरात जाऊन देवदर्शन घेत नसत. त्यांचा दाखला व हवाला देऊन उत्सव साजरा करणारे लोक क्षणभरसुद्धा एकाग्र होत नाहीत. विचार करीत नाहीत.' सारांश, जी व्हायला हवी होती ती बुद्धिवादाची स्थापना गणेशोत्सवाने आज होत नसेल आणि भविष्यकाळीही ती होण्याची चिन्हं दिसत नसतील, तर हा सामाजिक उत्सव नव्हे; तो सामाजिक उपद्रव आहे, असं का म्हणू नये?

बरं, ज्या प्रतीकाची पूजा केली जाते, त्यात तरी काही तथ्य असेल म्हणावं, तर तेथेही आनंदच आहे. सामान्य बुद्धीचे लोक गणेशाचं पूजन भातियुक्त आदराने करतात आणि त्या भावनेत आदर नाममात्र असतो. पण भीती मात्र खूप असते. हे लोक देवावरही विश्वास ठेवतात आणि भुतांवरही विश्वास ठेवतात. देव हे सत्य नसून श्रद्धेने केलेली ती कल्पना आहे, हे सांगताना प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'घरोघर देवाच्या मूर्ती असतात, प्रेषितांच्या प्रतिमा असतात, ती वास्तवाची चित्रं नसतात. कल्पनेच्या कुंचल्याने रेखाटलेल्या रंगरेषेतून प्रकट होणाऱ्या त्या कलाकृती असतात. माणसं देवाला आणू पाहातात व त्याला निरोप देतात. पण देव येतही नाही आणि जातही नाही! म्हणून माणसांनी मूर्तिपूजनाऐवजी विचारपूजन करावे.'

अलीकडे गणेशोत्सवात पुण्यासारख्या शहरातून महिलांमध्ये अथर्वशीर्ष घोकण्याची टूम मूळ धरते आहे. गीतेतील श्रीकृष्णाच्या विश्वरूपदर्शनाप्रमाणे गणेशांचं विश्वरूपदर्शन घडवणारं बौद्धिक वर्णन म्हणजे अथर्वशीर्ष! गणेशाला अथर्वशीर्षाद्वारे बुद्धीने जाणून घ्यावयाचं असतं, पण जी व्यक्ती स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवते अशी प्रगल्भ व्यक्तीच अथर्वशीर्ष म्हणू शकते. बुद्धीचा आश्रय सोडून जगणाऱ्यांना बुद्धिदात्याच्या पूजनाचा अधिकार नसतो. टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवात मुलांसाठी मेळे आणि प्रौढांसाठी भाषणाचं प्रबोधनपर्व रुजवून समाज डोळस - चौकस व्हावा, अशी अपेक्षा त्याचसाठी केली होती. पण त्यांच्या उपक्रमांची इतिश्री हुल्लडबाज वृत्तीच्या आणि सार्वजनिक वर्गणीच्या आयत्या पैशावर डल्ला मारू इच्छिणाऱ्या मंडळांनी कधीच करून टाकली आहे. त्यामुळेच आज गणेशाची कामनापूर्तीवाचक आरती आर्तपणे, विचलित चित्ताने, भाविक गात असतो. अथर्वशीषार्पेक्षा दुर्दैवाने अधिक प्रचलित असलेल्या ह्या आरतीद्वारे पुरुषाथार्ची हानी करणारी भावना जर व्यक्त केली जात असेल, तर तिच्या परिणाम स्वरूपी गचाळ जीवनच वाटणीला येणार!

काही थोडी शहाणी माणसं गणेशाला बुद्धिदाता म्हणतात. म्हणजे त्याच्या उपासकांनी त्याच्याकडे बुद्धी मागावी, त्याच्याकडे ज्ञान- विज्ञान मागावं, वाचन- वाचन-लेखन-चिंतन- मननाची शक्ती मागावी, तर्कबुद्धी आणि चिकित्साबुद्धी तर अवश्य मागावी, हे सुसंगत वाटतं. पण आरतीमध्ये यातील काहीच मागितलेलं नाही. 'संकटी पावावे, निवार्णी रक्षावे' एवढीच आपलं दुबळेपणा प्रकट करणारी मागणी ह्या पारंपरिक आरतीमध्ये आहे. बाकी सर्व पसारा खुशामतखोरीचाच आहे. उदाहरणार्थ, 'तू रत्नखचित आभूषणमंडित आहेस, चंदनाची उटी कुंकुमकेशर विलेपनयुक्त असून हिरेजडित मुकुट तुला शोभून दिसतो. तू पितांबर नेसलेला, लंबोदर (मोठे पोट असलेला) असून त्यावर सर्पबंधन शोभून दिसतं आहे. तू सरळ सोंड असलेला, वक्रतुंड, तीन डोळे असलेला (ज्ञानचक्षुयुक्त?) आहेस. रामाचा दास (?) तू घरी यावास अशी अपेक्षा करतो आहे. तू आमची संकटं दूर कर आणि आमचं प्राण वाचव.' अशा या चापलूसगिरीत बौद्धिक मागणी करण्याची आठवण होणं, कसं शक्य आहे?

गणेश म्हणजे मंगळग्रह! ज्या दिवशी ज्योतिष्यांनी मंगळ हा पापग्रह, क्रूरग्रह म्हणून घोषणा केली त्या दिवसापासून मंगलमूतीर्ची पूजा सुरू झाली. जो विघ्नकर्ता आहे; त्यालाच विघ्नहर्ता म्हणायचं, जो सुख नष्ट करणारा आहे; त्यालाच सुखकर्ता म्हणायचं, ही गावाला उपद्रव देणाऱ्याला 'दादा-बाबा' म्हणण्या- सारखी एक मखलाशी, युक्ती आहे. मंगळग्रहाचं हे थोतांड हिंदू धर्मियांतच मानलं जातं. इतर धर्मीय मंगळाला निरुपद्रवी ग्रहच मानतात. त्यांना एखादी मूर्खपणाची समजूत किती विराटरूप धारण करते, याचं आश्चर्यही वाटत असेल. गणेशाच्या पुराण कथेने तर जीवनाच्या प्रारंभीच ज्याच्यावर शिरच्छेदाचं संकट आलं, तो भक्तांचं संकट कसं दूर करू शकेल, हेच सूचित केलं आहे ना? म्हणून लक्षात घ्या- गुरुस्थानी जे जे असतील कोणी

गणेश म्हणूनी । पूजा त्यांना ॥ १
सैनिक, शिपाई । रक्षण करती
त्यांची गा आरती। मनोभावे ॥ २
प्राण वाचविती। डॉक्टर रोग्यांचे
उपकार त्यांचे। चित्ती आणा ॥ ३
माता-पिता थोर । तेच विघ्नहर्ते
तेच सुखकर्ते। पूजा त्यांना ॥४
बुद्धिनिष्ठ जपे। रक्षी तो स्वतःस
तीच गणेशाची । पूजा असे ॥५



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

---

प्रबोधन

## हम्मुराबीचा न्याय

इजिप्तच्या इतिहासात हम्मुराबी नावाचा न्यायव्यवस्थेचा मूलभूत विचार करणारा एक राजा होऊन गेला. त्याचा न्यायविषयक दृष्टिकोन खूप महत्त्वाचा तर होताच. शिवाय समाजातील दुष्ट प्रवृत्तींना धाकाच्या नियंत्रणात ठेवणाराही होता. त्याच्या निवाड्यांच्या हकिकती सकृतदर्शनी लोकविलक्षण पण विचारांती उद्बोधक वाटणाऱ्या आहेत. त्यातील एक निवाडा असा आहे. एकदा एक भिंत ढासळली आणि त्या भिंतीखाली सापडून एक मूल मेलं. मृत मुलाचा बाप हम्मुराबीकडे गेला. सर्व घटना समजून घेतल्यावर हम्मुराबीने फैसला सुनावला की, ज्या गवंड्याने ती भिंत बांधली, त्याच्या मुलाला तशीच भिंत ढासळवून मारावं.

या न्यायपद्धतीत कठोरपणा नक्की आहे, पण तिच्यात एक सामाजिक जाण आहे. समाजाला जागं करण्याइतकी शक्ती या निवाड्यात आहे. वरील घटना खरी आहे की खोटी नकळे, पण त्या घटनेचा धाक बसून पुढील काळात सदोष बांधकाम आपल्या हातून होणारच नाही, याची काळजी सर्व गवंड्यांनी घेतली असणार, यात वाद नाही. म्हणूनच हम्मुराबीचा जशास तसे हा न्यायनिवाडा महत्त्वाचा आहे.

भारतातील अनेक योजना फसलेल्या आहेत, असं दिसतं. काळम्मावाडीसारख्या धरणांचीगळती ही केवळ पाटबंधारे खात्याचीच डोकेदुखी नसून समाजहित, राष्ट्रहित विचारात घेणाऱ्या सुज्ञ नागरिकांच्याही चिंतेचा विषय आहे. शहरांच्या विस्ताराबरोबर पाणीपुरवठ्याच्या आखलेल्या सुधारित योजना भ्रष्टाचाराने पार फसलेल्या आहेत. बहुतेक शहरांतील पाणीपुरवठा योजना गळतीने जवळपास निरुपयोगी सिद्ध झाल्या आहेत. 'राष्ट्रासाठी सरकार जो एक रुपया खर्च करते, त्यातील ८५ पैसे भ्रष्टाचारी नोकर खातात आणि पंधरा पैसे राष्ट्रासाठी खर्च होतात,' असं माजी पंतप्रधान राजीव गांधी म्हणत असत. काळम्मावाडीसारख्या धरणांची गळती, अनेक पाणीपुरवठा योजना आणि असे बरेच लोक-कल्याणकारी कार्यक्रम हम्मुराबीच्या न्यायाने सुधारता येतात. धरणाच्या बांधकामावरील प्रमुख कार्यकारी अभियंता हाच हम्मुराबीच्या न्यायानुसार मुख्य आरोपी म्हटला पाहिजे. त्याला जर कठोर शासन झालं, तर बाकीचे अभियंते वचकून काम करतील.

प्रशासक, लोकनेते असोत वा धनिक; जे अन्याय, शोषण, छळ, लुबाडणूक करतात त्यांना यथायोग्य शासन झालंच पाहिजे. हम्मुराबी प्रमाणेच लोकहितवादीसुद्धा कठोर शिक्षेने भ्रष्टाचारी-दुराचारींना वठणीवर आणायची सूचना करताना लिहितात, 'इकडील लोकास राजा म्हणजे विष्णूचा अवतार व प्रधान म्हणजे ब्रह्मदेव वाटतो. त्यांनी अन्याय केला तरी म्हणतात की, राजा हरति सर्वस्वं तत्र का परिवेदना (अर्थात, राजाने सर्वस्व लुबाडले तरी दुःख करून चालत नाही.) असं आहे. तेव्हा या लोकांस सुधारणा माहीत नाही. परंतु ज्यास ज्ञान संपादन करण्याची इच्छा असेल त्याने इंग्लंड देशाचा वृत्तान्त काढून पाहावा. तेथील राजाकडून अन्याय झाले; याजमुळे सर्व रयतेने त्याजवर उठून त्याजपासून करार करून घेतला. तो करार हल्लीपर्यंत चालू आहे हे समजेल. सर्व कायद्याचे मूळ तेच आहे. ' लोकहितवादींनी चार्ल्स राजाला लोकांनी मृत्युदंड दिला, जेम्स राजाला पदच्युत केलं असं सांगून शासकांवर लोकांनी नियंत्रण ठेवलं पाहिजे, असं स्पष्ट केलं आहे.

अरब देशात बलात्कार, दरोडे, खून, फसवेगिरी, खोट्या नोटा छापणे, खोटी प्रमाणपत्र देणे, वाचकांची पसंती सावकारी जुलूम या गुन्ह्यांसाठी त्याची ही पावती हम्मुराबी पद्धतीच्या शिक्षा हयगय न करता आणि मानवतेच्या खोट्या कल्पना झिडकारून कठोरातिकठोर शिक्षा केल्या जातात. जाहीर फाशी देणं, हातपाय तोडणं, गोळ्या घालून ठार करणं हे सर्व अमानुष आहे. पण माणुसकीचे परिमाण पशुतुल्य माणसांना लावणं वेडसरपणाचं आहे. एका वेळी एकाच सुरीने ५-५ बाळांचे- स्त्रियांचे गळे चिरणाऱ्या नराधमांना लोकांनी दगडांनी ठेचून मारणं आवश्यक आहे. मानवाधिकारांचा हक्क मानव या व्यारव्येला पात्र असलेल्यांना असतो. जनावर, श्वापद, प्राणी या वर्गात जी माणसं मोडतात त्यांना हम्मुराबीचा निवाडाच लावला पाहिजे. तरच समाज योग्य मागार्ने चालेल, अन्यथा नाही. कारण-

माणसांची रूपे । जनावरे घेती
आसपास वस्ती। असे त्यांची ॥ १
ओळखावे त्यांना । व्हावे सावधान
व्यर्थ नको प्राण । कधी जाणे ॥ २
मुलां लेकरांना । वारा नको त्यांचा
प्रसंग घाताचा । येणे नको ॥३
खुनी, बलात्कारी। गुंड नि मवाली
बाधते सावली । सुद्धा त्यांची ॥४
कठोर, निर्दयी शिक्षेचाच धाक
पशुत्वा मारक । होई तोच ॥ ५
कायद्याची कक्षा । विस्तृत करावी
संशया नसावी । जागा कोठे ॥ ६
माणसात येण्या । त्यांना करा साह्य
तो एक उपाय । आरंभीचा॥ ७
माणुसकी जपा । तीच श्रेष्ठ जगी
अन्य ती वाऊगी। सारी नीती ॥८
जग माणसांचे । आनंदाने भरा
क्रौर्या नको थारा । कदापिही ॥ ९
सर्वां सुख लाभो । दुःखी नको कोणी
खरी करा वाणी । थोरात्म्यांची १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

---

# निस्वार्थ प्रेमाचा अन अखंड श्रमाचा झरा!

# "सोलापूरचे शिल्पकार : सुशीलकुमार शिंदे!"

आपल्या ५५वर्षांच्या नैतिक व प्रामाणिक सामाजिक जीवनात आणि राजकीय कारकीर्दीत भूषवलेली सर्व सन्मानांची पदे व संवैधानिक जबाबदारी पार पाडताना आपल्या जन्मभूमी सोलापूर करिता सतत विकासाचा हक्काचा वाटा पोचवण्याचं प्रामाणिक काम सोलापूरचे सुपुत्र आदरणीय सुशीलकुमार शिंदे यांनी जाणीवपूर्वक केल्यानेंच सोलापूरचं नाव आज देशाच्या नव्हे तर जगाच्या नकाशावर ठळकपणे प्रतिबिंबीत होत आहे.

दगडू संभू शिंदे उर्फ सुशीलकुमार संभाजीराव शिंदे, गरीब घरातला एक सामान्य तरुण ते असामान्य व्यक्तिमत्त्व हा प्रवास कदाचित पुढील पिढ्यांमध्ये अविश्वसनीय वाटावा असाचं आहे. जीवनात एक माणूस आमदार, राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, मुख्यमंत्री, राज्यपाल, खासदार, केंद्रीय मंत्री, देशाचा गृहमंत्री, संसदेचा नेता ही सर्व भारतीय लोकशाहीतील संविधानिक पदे आपल्या कर्तृत्वाने भूषवतो हि बाब स्वतंत्र भारतात अभिमानास्पद आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे फोरम फॉर सोशलीस्ट ॲक्शनचे राज्य निमंत्रक, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष, केंद्रीय सरचिटणीस, 14 राज्याचे प्रभारी, सर्वोच्च काँग्रेस वर्किंग कमिटी CWCमेंबर, उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार, नियोजन घटना शिस्तपालन समितीचे सदस्य यासह अनेक संघटनात्मक जबाबदारी शिंदे साहेबांनी पार पाडली आहे.

देशातील अनेक विद्यापीठांनी मानद डि.लीट पदवीने सन्मानीत करून त्यांचा गौरव केला आहे, कुलपती होण्याचा बहुमान सुद्धा त्यांना मिळाला, जगातील सर्वोच्च "युनो" मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून आंतरराष्ट्रीय स्तरावरील बालकामगार व असंघटीत कामगारांच्या प्रश्नावर प्रबंध सादर करण्याचे भाग्य त्यांना मिळाले.

आपल्या गौरवशाली प्रवासात सुशीलकुमार शिंदे यांनी स्वतःची "सोलापूरचा सुपुत्र" ही ओळख सातत्याने सर्वत्र ठसविली म्हणूंनच आजही भारतात कोणत्याही शहरात गेलेल्या सोलापूरकरांना सोलापूरचा आहे म्हटल्यावर "सुशीलकुमार शिंदे जी का गांववाला है" म्हणून आदराने सन्मान दिला जातो हि खरंतर आपल्या सर्व सोलापूरकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे.

सोलापूर शहर व जिल्हा याचा सामाजिक, पायाभूत, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास सातत्याने डोळ्यांसमोर ठेवून १०लाख लोकसंख्येचं बहुभाषिक कामगारांचे शहर व सुमारे 40 लाख लोकसंख्येचा दुष्काळी अवर्षणग्रस्त जिल्हा हि ओळख असताना आपल्या सोलापूरची सर्वांगीण प्रगतीची गरज ओळखून आजपर्यंत दरवेळी अनेकानेक नाविन्यपूर्ण कामे आदरणीय शिंदे साहेबांच्या मेहनतीने, नियोजनाने, दूरदृष्टीने, सातत्यपूर्ण प्रामाणिक प्रयत्नाने साकारली आहेत..

सर्वांगीण विकास कामांची यादी तशी मोठी आहे तरीसुद्धा हा थोडक्यात आढावा घ्यावा लागतोय...,

महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री असताना सोलापूरची वरदायिनी



भीमा नदीवर "उजनी धरणाच्या" योजना, कालवे, वितरिका, मोठे मध्यम साठवण तलाव यांना सलग दहा वर्षे एक रुपया कमी पडू दिला नाही आज त्याची प्रचीती म्हणून जिल्ह्यात डाळिंब, द्राक्ष, केळी, बोर फळबागांचे प्रचंड उत्पादन तर बागायती उसाचे क्षेत्र वाढून देशात सर्वोच्च एका जिल्ह्यात 42 साखर कारखाने उभारलेत. राष्ट्रीय ज्वारी, डाळिंब, ताग संशोधन केंद्र कार्यान्वित आहेत, सोलापूर शहरासाठी उजनी धरणावरून 110 कि.मी. लांबीची पाइपलाइन सोलापूरकरांची तहान भागवते आहे, ४५वषार्पूर्वी आणलेलं आकाशवाणी केंद्र अविरत मनोरंजन करत आहे.

'मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य' असताना सोलापूरला एका जिल्ह्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ मंजूर केलं आणि जिल्ह्यात शैक्षणिक क्रांती झाली आज रोजी जिल्ह्यात 150 महाविद्यालये, दोन मेडिकल कॉलेज, दोन आयुर्वेदिक कॉलेज, दोन होमिओपॅथिक कॉलेज, 27 इंजिनिअरिंग/ डिप्लोमा कॉलेज, एकमेव विज्ञान केंद्र यांनी जिल्ह्याचा शैक्षणिक वटवृक्ष बहरला असून लक्षावधी तरुण विद्यार्थी दजार्वान पदवीसंपन्न होत आहेत.

सोलापूरचे "छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचा" कायापालट केला व विस्तारित 'बी' ब्लॉक नव्याने बांधल्याने आज रोजी रोज ५०००हजार रूग्णांची ओपीडी चालू असून, १५०० रुग्णांच्या ॲडमिटची सोय झाल्याने सोलापूर आजूबाजूच्या जिल्ह्यातील जनतेच्या रूग्णसेवेला सक्षम झाल्याने विविध हॉस्पिटल्स, डायग्नोस्टिक सेंटर्स, प्रथितयश डॉक्टर्स यांचे उत्कृष्ट नेटवर्क निर्माण झाले असून आज सोलापूर 'मेडिकल हब' म्हणून ओळखले जात आहे.

केंद्रीय मंत्री म्हणून भारताच्या मंत्रिमंडळात काम करताना उजार्मंत्री असताना 1320मेगावॅट ठळढउ वीजनिर्मिती प्रकल्प उभारला, 5000 मेगावॅटचे पॉवरग्रिड उभारले यामुळेच हजारो रोजगार निर्मितीचे साधनं निर्माण झाली, अर्थकारण वाढलं, विशेषतः सन 2012 सालापासून सोलापूरला लोडशेडिंगचा त्रास बंद झाला. याच काळात सोलापुरात आंतरराष्ट्रीय डॉक्टर कोटणीस यांचे स्मारक उभारले गेले जे संपुर्ण जगातील पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे.

देशाच्या स्तरावर "गृहमंत्री व संसदेचा नेता" म्हणून काम करताना सोलापूरला 7नॅशनल हायवे मंजूर झाले, देशातील सर्व दिशेला प्रयत्नपूर्वक रेल्वे सेवा चालू केली आणि सोलापूर शहर-जिल्हा देशाच्या कानाकोपऱ्यात जाणायोग्य दळणवळणाने सिद्ध झाला, सोलापूर जिल्हा देशाच्या नकाशावर आला. गृहमंत्री म्हणूनच निमलष्करी दलाची तीन ट्रेनिंग मिलिटरी सेंटर BSF, CISF, SSB ही मंजूर केली.

सोलापूर शहराच्या पायाभूत विकासाकरता नियोजन, वित्तआयोग, UIDSSMT, JNNURM, नगरोत्थान योजनांमधून हजारो कोटी रुपये मंजूर करून रस्ते, ड्रेनेज, पाण्याच्या टाक्या, वसाहती, सुविधा निर्माण केल्या. सोलापूरचा स्मार्ट सिटी समावेश याच आधारावर झाला आहे. शहरात तीन एमआयडिसी निर्माण झाल्या, शहरातील मध्यवस्तीमध्ये 1975 ला चालू केलेले विमानतळ असताना भविष्याची गरज ओळखून बोरामणीला आंतरराष्ट्रीय 'कार्गोहब' विमानतळ मंजूर केले दोन हजार एकर जमीन संपादित केली आहे.

धार्मिक यात्रेकरूंना आज सोलापूर, पंढरपूर, अरण, मार्डी, वडवळ, मंगळवेढा, अक्कलकोट, तुळजापूर, गाणगापूर, कुडलसंगम ही सर्व तीर्थक्षेत्रे पर्यटन विकासाची केंद्रे झाली आहेत. सोलापुरात हुतात्मा स्मृती मंदिरचे नूतनीकरण व फडकुले सभागृहाची उभारणी, महामहिम राष्ट्रपतींच्या उपस्थितीत ८८वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे भव्यदिव्य आयोजन, उर्दू संमेलनाचे आयोजन, दमाणी-पटेल पुरस्कार हे सर्व सोलापूरच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या बाबी आहेत. सुशीलकुमार शिंदे साहेबांचा कलावंत म्हणून रसिकांचा उत्साह वाढवणारी आहेत.

लोककल्याणकारी भारतातील लोकप्रतिनिधी म्हणून सोलापूरच्या जनतेने दिलेल्या प्रचंड प्रेमाची व दाखवलेल्या विश्वासाची उतराई कृतज्ञतेच्या स्वरूपात सुशीलकुमार शिंदे यांनी आपली संपूर्ण राजकीय ताकद पणाला लावून सोलापूरसाठी प्रामाणिकपणे भरभरून देण्याचा प्रयत्न आजपर्यंत केला आहे. हा निस्वार्थ प्रेमाचा अन् अखंड श्रमाचा सोलापूरचा 'भगीरथ' म्हणूनच "सोलापूरच्या सर्वांगीण विकासाचा शिल्पकार!" आहे असं माझं ठाम मत आहे.

प्रिय साहेब,

आज ८४व्या वाढदिवशी आपण प्रचंड इच्छाशक्ती, मनोबल व उत्तम प्रकृतीने निरंतर आनंदी, यशस्वी, १०० शतायुषी व्हावे हीच नियतीच्या, शक्तीमाता आईभवानीच्या व जगतनियंत्या सावळ्या पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना!

**..ॲड. मनीश गडदे पाटील,**
सेक्रेटरी, महाराष्ट्र प्रदेश
काँग्रेस कमिटी मुंबई
मो. 8275302812
manishgadade009@gmail.com

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# काँग्रेस कमिटीचे सहकार सेलचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांना उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानचिन्ह



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सहकार सेलच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा ड. शुभांगी शेरेकर यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सहकार विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त काँग्रेस कमिटीचे सहकार सेलचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष रणजितसिंह हंसाजीराव देशमुख यांना उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले आहे.

काँग्रेस कमिटीचे सहकार सेलचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी लोकसभा निवडणुकीत उत्कृष्ट कार्य केले आहे. काँग्रेस च्या विचारांचा प्रसार आणि प्रचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट केले. तसेच सहकाराच्या माध्यमातून जिल्ह्यात सहकार चळवळ उभा केली. त्याचबरोबर जिल्ह्यात बुडालेल्या पतसंस्था पुनर्जीवित केल्या.

काँग्रेस कमिटीचे सहकार सेलचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांच्या कार्याची दखल घेवून काँग्रेस सहकार सेलच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा ड. शुभांगी शेरेकर यांनी दि. ५ जुलै असणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित मुंबई येथील टिळक भवनात सन्मान चिन्ह देवून गौरविले आहे. यावेळी काँग्रेस चे माळशिरस तालुका अध्यक्ष सतीशनाना पालकर, काँग्रेसचे सोशल मिडिया तालुका अध्यक्ष मयूर माने आदींसह चांगदेव बनकर, रफिक सय्यद, संदीप रेडेकर, बंडू खंडागळे, सुरज डांगे, संजय भोसले, नागेश गव्हाणे, सतीश साठे, बळीराम ठोंबरे, प्रवीण भानवसे आदी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत १.१० लाखहून अधिक विद्यार्थ्यांची निवड

## साठ हजारहून अधिक युवा प्रशिक्षणासाठी रुजू

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या घोषणेपासून आजपर्यंत ३.३५ लाख रोजगारासाठी २.८५ लाख युवक-युवतींनी आपली मागणी नोंदवली आहे. यौपैकी १.१० लाख जणांना प्रत्यक्षात रोजगार प्राप्त झाला आहे. यापैकी ६० हजाराहून अधिक युवा राज्यातील खाजगी तसेच शासकीय संस्थांमधे प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज दिली.

याविषयीची अधिक माहिती देतान मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की ह्नभविष्यातील रोजगाराची आव्हाने ओळखून आजच कार्य प्रशिक्षण देवून, रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून युवक-युवतींना रोजगारक्षम बनविणारी, 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' ही राज्य शासनाने सुरू केली आहे. या योजनेमध्ये सरकारी तसेच खासगी आस्थापनांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. अधिकाधिक युवकांना प्रशिक्षणाबरोबर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.ह्व

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहे. या योजनेला फक्त शहरी विभागातच नाही तर ग्रामीण भागातही चांगला प्रतिसाद मिळत आहे. विभागवार या योजनेचा आढावा घेताना छत्रपती संभाजीनगर आणि त्या खालोखाल अमरावती विभागाने यामध्ये चांगली कामगिरी केली आहे. तर जिल्हावार विचार करता धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ५००० युवा रुजू झाले आहेत. शासनाच्या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात जुलै आणि ऑगस्टमध्ये रुजू झालेल्या युवांना डीबीटीद्वारे विद्यावेतन १० सप्टेंबरपर्यंत त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर मिळणार आहे, असे मंत्री लोढा म्हणाले.

या योजनेतून महाराष्ट्रातील युवकांना फक्त रोजगारच मिळणार नसून उद्योगांना लागणारे मनुष्यबळ सहज उपलब्ध होऊन महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होणार आहे. ही योजना वर्षभर सुरु राहणार असून या योजनेमार्फत १० लाख युवांना प्रशिक्षणातून रोजगार देण्याचे उद्दीष्ट आहे. सर्वसमावेशक अशी ही योजना महाराष्ट्र शासनाने युवकांसाठी आणली असून युवकांनी आणि उद्योगांनी देखील याचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा असे आवाहन लोढा यांनी यावेळी केले.

# मराठा सेवा संघाचे 'मराठा भूषण' पुरस्कार जाहीर

## डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील, डॉ. राणे, ॲड पाटील, पै मगर, प्रा. सावंत, पवार व पराडे होणार सन्मानित

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आपल्या कार्यकर्तृत्वाने समाजासाठी योगदान देणाऱ्या मराठा समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या गुणीजनांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उत्तमराव माने यांनी दिली यावेळी मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष रवींद्र पवार , अध्यक्ष निनाद पाटील, कार्याध्यक्ष डॉ. अमोल माने, सचिव राजेंद्र मिसाळ, बाळासाहेब पराडे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

रविवार दि 8 सप्टेंबर रोजी सकाळी 10 .00 वा अकलूज येथील अन्नपूर्णा मंगल कार्यालय या ठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील असणार असून पुरस्कार वितरण सोहळा माढा लोकसभा मतदार संघाचे नूतन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते तर प्रमुख उपस्थिती म्हणून अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितल देवी मोहिते पाटील, अकलूजचे माजी सरपंच शिवतेसिंह मोहिते पाटील यांच्यासह माळशिरस तालुक्यातील अधिकारी वृंद उपस्थित राहणार आहे

मराठा सेवा संघाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारामध्ये ज्यांचे नोबल पुरस्कारासाठी नामांकन झाले होते त्या डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते -पाटील, यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार, वैद्यकीय क्षेत्रामध्ये गेल्या 44 वर्षापासून अविरत सेवा देणारे अकलूजचे प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. राजीव राणे- कविटकर, विधीक्षेत्रात बोरगाव येथील ॲड प्रकाश पाटील, क्रीडा क्षेत्रात आपल्या कुस्तीने सर्व दूर परिचित असलेले निमगाव येथील मल्लसम्राट पै. रावसाहेब मगर, शिक्षण क्षेत्रात नातेपुते येथील प्रा. उत्तम सावंत, प्रसार माध्यम क्षेत्रात काम करणारे नातेपुते येथील पत्रकार संजय पवार, तर कृषी क्षेत्रात योगदान देणारे बाभुळगाव येथील अजित पराडे यांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे .

यावेळी बहुजन समाजातील सर्वच संघटनांना निमंत्रित केले असून विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थी, अधिकारी, पालक यांचाही यावेळी मराठा सेवा संघाच्या वतीने सन्मान करण्यात येणार असून सर्वांनीच या कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन मराठा सेवा संघ तालुका शाखा माळशिरस च्या वतीने करण्यात आले आहे.

# वाशिंबेत जे.के फाउंडेशनच्या शिबिरात १०५ जणांचे रक्तदान



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** देशभक्त स्वर्गीय जगन्नाथ कृष्णाजी भोईटे यांच्या ५६ व्या स्मृतीदिनानिमित्त शरदचंद्रजी पवार विद्यालय वाशिंबे येथे रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात १०५ युवकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. या शिबिराचे उद्घाटन छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून डॉ. सुदर्शन नवनाथ झोळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपस्थित कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नवनाथ बापू झोळ,विद्यालयाचे मुख्यध्यापक रमेश यादव,शेतकरी संघटना अध्यक्ष भाऊसाहेब झोळ, भैरवनाथ मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नानासाहेब झोळ, सोसायटी चेअरमन राजाभाऊ झोळ, कल्याण मगर, विलास झोळ, आण्णासाहेब टापरे, ज्ञानदेव झोळ,संतोष झोळ, अजित झोळ,सुभाष झोळ, योगेश झोळ, आण्णा झोळ आदींनीं स्मृतिदिनानिमित्त भोईटे गुरूजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

सामाजिक बाधिंलकितून आरोग्य विषयी असे समाज उपयोगी कार्यक्रम दरवर्षी गावामध्ये फाउंडेशन राबत आहेत. आतापर्यंत युवक मित्रांच्या मदतीने दरवर्षी रक्तदान शिबिर घेत ६९३ युनीट रक्त संकलन करून रक्तदानाचे सारखे मोठे काम जे.के. फाउंडेशनचे अध्यक्ष अमोल भोईटे यांनी केले आहे. शिबिरात गावातील युवकांनी उत्फुर्तपणे सहभाग नोंदवला.

# पंढरपूर मंदिर समितीच्यावतीने विठ्ठल भक्तांना सोयी सुविधा द्या

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मंदिर समितीला निवेदन



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या सुविधा पुरवण्याबाबत स्वाभिमनी रिपब्लिकन पक्ष पंढरपूर यांच्यावतीने मंदिर समितीला निवेदन देण्यात आले.

मंदिर परिसरातील पिण्याचे पाणी एटीएम पद्धतीने चालू केलेले होते सध्या ते बंद आहे ते चालू करावे. तसेच पंढरपूर चंद्रभागा वाळवंटाम ध्ये चेंजिंग रूम हे नसून नव्याने बसवण्यात यावे. तसेच मंदिर परिसरामध्ये व्हीआयपी दर्शन बाबत योग्य ते सूचना फलक लावण्यात यावे. एजंट मार्फत दर्शन कोणीही घेऊ नये याबाबत मंदिर समितीच्या वतीने जनजागृती करण्यात यावी.

दर्शनाला येणाऱ्या भाविक यांना मोबाईल लॉकर चार्ज आकारला जातो ते नि शुल्क करण्यात यावे. आदी मागण्याची पूर्तता करावी. अन्यथा संत तुकाराम महाराज भवन येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. निवेदन देताना स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष आनंद लोंढे साहेब, धर्मवीर प्रतिष्ठान अध्यक्ष, नवनाथ चव्हाण, समाधान पिसे, साहेब पंढरपूर शहराध्यक्ष अमोल घोडके, धनाजी पाटील, यावेळी उपस्थित होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र.२०२४/कु.का.(जन्म नोंद) एस.आर.नं.:-१२४/२०२४

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

आयुब जाफर खान-पठाण, रा. कुर्डुवाडी ता. माढा जि. सोलापूर } अर्जदार

विरूध्द

मुख्याधिकारी, नगरपरिषद कुर्डुवाडी, ता. माढा जि. सोलापूर } सा. वाला

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे स्वतः आयुब जाफर खान पठाण यांचा जन्म दिनांक २४/०६/१९५८ रोजी कुर्डुवाडी ता. माढा येथे झालेला आहे. परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. कुर्डुवाडी येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा कुर्डुवाडी येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे स्वतः आयुव जाफर खान-पठाण यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख ११/१०/२०२४ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/ तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे यांचे जन्म दिनांक २४/०६/१९५८ रोजीचे जन्म नोंद धरून तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल. तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही.यांनी नोंद घ्यावी. ही नोटीस आज दिनांक ३/९/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**सही /- तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा**

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र.२०२४/कु.का.(जन्म नोंद) एस.आर.नं.:-१११/२०२४

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

श्री. निलेश शिवमूर्ती नलवडे, रा. लऊळ. ता. माढा. जि. सोलापुर } अर्जदार

विरूध्द

ग्रामसेवक, ग्रामपंचायत लऊळ ता. माढा. जि. सोलापुर } सा. वाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचा मुलगा चि. राजवीर निलेश नलवडे याचा जन्म दिनांक २५/०३/२०१८ रोजी लऊळ. ता. माढा येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद पुर्वी ग्रामपंचायत, लऊळ येथे केलेली नसल्याने अर्जदार यांनी ग्रामपंचायत, लऊळ येथील रजिष्टरला नोंदवुन तसा दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्यांचा मुलगा चि. राजवीर निलेश नलवडे यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख ११/१०/२०२४ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय,माढा येथे मांडावी. मदर मुदतीत कुठलीही हरकत / तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना त्यांचा मुलगा चि. राजवीर निलेश नलवडे याचा जन्म दिनांक २५/०३/२०१८ रोजीचे जन्म नोंद धरून तसा दाखला देण्यावावत योग्य ते आदेश करण्यात येईल. तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.ही नोटीस आज दि. ३/९/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**सही /- तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र.१७१/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. सतिश अभिमान काटे, रा. बंगले गल्ली, वैराग ता. बार्शी (असल्यास, तर्फे वकीलकाशीद एस आर) } अर्जदार

विरूध्द

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी, न.प. वैराग } गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांची पणजी दगडूबाई कृष्णा काटे, रा. बंगले गल्ली, वैराग ता. बार्शी यांचा मौजे वैराग ता. बार्शी राहत्या घरीया ठिकाणी दिनांक ०८ जुलै १९५२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांची पणजी यांचा दिनांक ०८ जुलै १९५२रोजी मौजे वैराग ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी वं शिक्यानिशी दिली. **सही /-**

**कार्यकारी दंडाधिकारी,बार्शी**

## जाहीर प्रसिद्धीकरण

अर्ज क्र.२६६/२०२४

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

श्री. दिपक महादेव जानकर,वय - ३४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर }अर्जदार

विरूध्द

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपरिषद मोहोळ, मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी.) }सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार म्हणजेच दिपक महादेव जानकर याचा जन्म ता. ०५/०२/१९९० रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार म्हणजेच दिपक महादेव जानकर याची जन्म दाखल्याची ता. ०५/०२/१९९० रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे फेब्रुवारी १९९० चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच दिपक महादेव जानकर याची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. ०३/१०/२०२४ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.३०/०८/२०२४

**सही/कनिष्ठ लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र.२०२४/कु.का.(जन्म नोंद) एस.आर.नं.:-१२२/२०२४

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

कुतुबुददीन खाजाभाई बागवान रा.कुर्डुवाडी ता. माढा जि. सोलापूर } अर्जदार

विरूध्द

मुख्याधिकारी, नगरपरिषद कुर्डुवाडी, ता. माढा जि. सोलापूर } सा. वाला

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे मुलगा मोहसीन कुतुबुददीन बागवान यांचा जन्म दिनांक १२/०७/१९८६ व मुजमिल कुतुबुददीन बागवान यांचा जन्म दिनांक ०७/०८/१९८९ रोजी कुर्डुवाडी ता. माढा येथे झालेला आहे. परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. कुर्डुवाडी येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा कुर्डुवाडी येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळवण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे मुलगा मोहसीन कुतुबुददीन बागवान व मुजमिल कुतुबुददीन बागवान यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख ११/१०/२०२४ रोजी लेखी अथवा तोडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/ तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे यांचे जन्म अनुक्रमे दिनांक १२/०७/१९८६ व ०७/०८/१९८९ रोजी जन्म नोंद धन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल . तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी. ही नोटीस आज दिनांक ३/९/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**सही /- तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा**

## कटूसत्य शब्दकोडे क्र. १००

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | | ५ | ६ | | ७ | ■ |
| ८ | | | ■ | ९ | | ■ | १० | | ■ | ११ | |
| | ■ | ■ | १२ | | | ■ | १३ | | १४ | | ■ |
| १५ | १६ | १७ | | ■ | | ■ | ■ | ■ | | ■ | १८ |
| ■ | १९ | | ■ | २० | | | २१ | २२ | ■ | २३ | |
| ■ | ■ | २४ | | ■ | | ■ | २५ | | | | |
| २६ | | | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | | ■ |
| | ■ | ■ | २९ | | ■ | ३० | | ■ | ३१ | | ३२ |
| ३३ | ३४ | ३५ | | | ■ | | ■ | ३६ | | ■ | |
| ३७ | | | ■ | ■ | ३८ | | ३९ | ■ | ४० | ४१ | |
| ■ | ४२ | | ■ | ४३ | | ■ | ४४ | ४५ | | | ■ |
| ४६ | | ■ | ४७ | | | ■ | ४८ | | ■ | ४९ | |

**उभे शब्द :** १) विचार विनिमय, सल्ला **** २) फुलांची माला, पराभव ३) धान्याचा ढीग ४) एक म्हण-**** *** गुडघ्याला बाशिंग ५) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ६) आ. बच्चू कडू यांची संघटना ७) नगर, सिटी ९) महिना १२) पानाचा विडा रंगण्यासाठी त्यामध्ये हा वापरतात १४) सहा गुणिले दोन १६) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट ** १७) कॉलनी (मराठीत) १८) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २१) दुर्लक्ष, आबाळ २२) पती २३) अभिनेत्री असलेली रमेश देव यांची पत्नी २६) लगेच, तात्काळ २७) चांगलाच्या विरूध्दार्थी २९) पूर्वी बांधले जाणारे चिरेबंदी चौसोपी निवासस्थान ३०) गाईचे पिल्लू ३१) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ३२) स्वर्गच्या विरूध्दार्थी ३४) भित्रा, घाबरट ३५) एक दाक्षिणात्य अभिनेता-*** हसन ३८) उष्ण, तप्त ३९) भरावासाठी वापरले जाणारे दगड, मुरूम इत्यादी ४१) चिंतन ४३) भिंतीवरील सरपटणारा प्राणी ४५) सल उलट लिहा

**आडवे शब्द :** १) आपले राज्य ४) सर्वाधिक खासदार या राज्यातून निवडले जातात ८) श्रेष्ठ, वरचढ ९) आई १०) तीन दुणे ११) एक शिवकालीन घोषणा- ** हर महादेव १२) ससा आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे १३) राजाचा सभामंडप १५) दोहोंतील अंतर, भेद १९) पृथ्वी, पातळ कालवण २०) भारताचे यापूर्वीचे पंतप्रधान-***** सिंह २३) श्रीरामाची पत्नी २४) बसपाचे निवडणूक चिन्ह २५) महाराष्ट्रातील या जिल्ह्याच्या नावामध्ये काना, माला, वेलांटी काही नाही २६) भाकरी थापण्याचे गोलाकार पात्र २७) वायू, पवन २८) शिरा २९) पाचगणीला जाताना या शहरातून जावे लागते, सातारा जिल्ह्यातील या ठिकाणचे महागणपतीचे मंदिर प्रसिध्द आहे ३०) इंग्रजी मुळाक्षरातील शेवटून दुसरे अक्षर ३१) एक भारतीय फलंदाज-शिखर *** ३३) आकाशातील विजांचा चमकताना होणारा आवाज ३६) सर्व (हिंदीत) ३७) कडक नसलेले, मऊ ३८) आकाशात उंच भरारी घेणारा पक्षी ४०) हिंमत ४२) खांब ४३) पलीकडे, पल्याड ४४) ताकदवान ४६) पाच वजा चार ४७) जखमेवर लावतात तो ४८) रूची, आवड, फळातील द्रव ४९) पाच आणि चार मिळून होणारी संख्या

### शब्दकोडे क्र. ९९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | नु | मा | न | ■ | जो | ति | बा | ■ | ग | णे | श |
| ज | ■ | ल | स | ■ | क | ळ | स | ■ | ड | ■ | र |
| र | ज | क | ■ | हा | र | ■ | री | घ | ■ | म | द |
| ज | मा | ■ | सा | त | ■ | श्री | ■ | व | र्ल्ड | क | प |
| बा | व | न्न | ■ | च | हा | ■ | मा | घ | ■ | र | वा |
| बी | ■ | ■ | ना | ला | ■ | ए | क | वी | स | ■ | र |
| ■ | चा | ■ | रा | खी | ■ | क | ■ | त | र | स | ■ |
| व | र | मा | य | ■ | क | ता | र | ■ | डा | ब | र |
| खा | ■ | व | ण | व | ण | ■ | न | ■ | ■ | का | म |
| र | ई | स | ■ | न | क | ली | ■ | प्र | जा | ■ | मा |
| ■ | ■ | भा | र | ■ | व | न | ■ | शां | ■ | स | ण |
| ■ | पा | ऊ | स | ■ | ली | ■ | म | त | दा | न | ■ |


# Classified - छोटी जाहीरात

## विक्री

विविध डिझाईनचे फॅशनेबल स्ट्रेचेबल ब्लाउज विक्रीसाठी उपलब्ध. रेडिमेड ब्लाउज विक्रीचे प्रसिद्ध शॉप. रसगंध लेडीज वेअर, नवी पेठ, दिवेकर बेकरी समोर, सोलापूर
**मो - 9890232227**

## विकणे आहे

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क: 9881361260**

## विक्री

**गौरी व गणपती सण आनंदित होण्यासाठी जगदंब फॅमिलीच्या वतीने आसरा चौक कोकण फॅमिली टेरेस मध्ये गिफ्ट रोपं तसेच राजस्थान भागातील कलर दगड चे प्रदर्शन व विक्री संपर्क ९८५०२३९९९८**

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, मार्केटींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्क: **9591409911 / 9272021110**

|| श्री अनगरसिद्ध प्रसन्न ||

## R.K कन्स्ट्रक्शन्स्



इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...
* बांधकाम नकाशा * स्टील डिझाईन
* इंटेरियर डिझाईन * इस्टिमेट
* 3 D डिझाईन * साईट सुपरव्हिजन
* कॉन्ट्रॅक्ट वर्क्स * ब्लु प्रिंटस्
* बांधकाम परवाना * लेबर सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
ऑफिस :- ग्रामीण रुग्णालयासमोर, तहसिल कार्यालयाजवळ, मेनरोड, मोहोळ
Mo. 9552547272, 8788832033 (Email:swapnil9399@gmail.com)

## कंट्रक्शन

**आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स मो. ९३७१५२३९३९**

## लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय

**फक्त ५१०००/- रु.**
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

## नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट



**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय
गृहमंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
मा. श्री. सुशीलकुमारजी
शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :
श्री. लक्ष्मण नारायण भोसले
अध्यक्ष, विमुक्त भटक्या जाती व
जमाती विभाग, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी


काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय
गृहमंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
मा. श्री. सुशीलकुमारजी
शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :
श्री. विजय साळुंके
सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी


काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय
गृहमंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
मा. श्री. सुशीलकुमारजी
शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :
श्री. प्रशांत पुंडलिक साळे
मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटी


काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय
गृहमंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
मा. श्री.
सुशीलकुमारजी
शिंदे साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक :
श्री. रणजितसिंह हंसाजीराव देशमुख
अध्यक्ष, सहकार सेल
सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी


क्षितीजाला
गवसणी
घालणारे
कर्तृत्व
राजकारणाचा
मानदंड
ठरलेले
नेतृत्व
प्रत्येकाला हवं-हवसं
वाटणारं नेतृत्व म्हणजे
शिंदेसाहेब
मा. केंद्रीय गृहमंत्री, भारत सरकार
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. केंद्रीय ऊर्जामंत्री, भारत सरकार
मा. राज्यपाल, आंध्रप्रदेश
आदरणीय
सुशीलकुमार
शिंदेसाहेब
आपणांस वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा...
शुभेच्छुक
जनसेवक
महादेव कोगनुरे मित्र परिवार
संस्थापक, एम.के.फाऊंडेशन
मुख्य व्यवस्थापक, सागर सिमेंट लि.
दक्षिण सोलापूर तालुका विधानसभा मतदार संघ


सहकार शिरोमणी
आपला माणूस
आपल्यासाठी...
* प्रांतिक सदस्य: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, * चेअरमन: स.शि.वसंतराव काळे सह.सा.का., भाळवणी
* अध्यक्ष: श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ, * मार्गदर्शक: निशिगंधा सहकारी बँक लि. पंढरपूर
* अध्यक्ष: वसंतदादा प्रतिष्ठान, पंढरपूर
मा. कल्याणरावजी काळे साहेब
आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..!
।। शुभेच्छुक ।।
वसंतराव काळे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय वाडीकुरोली-धोंडेवाडी
वसंतराव काळे विद्यामंदीर, चंद्रभागानगर, भाळवणी, ता. पंढरपूर
जनकल्याण इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, धोंडेवाडी ता. पंढरपूर